## नि.क्र. १५ वर आदेश
(दिनांक ०४.०१.२०२१)

प्रतिवादींनी सदरचा अर्ज त्यांच्याविरुद्ध विना लेखी जबाब पारित झालेला आदेश रद्द करण्याकरीता व अभिलेखावर त्यांचा लेखी जबाब घेण्याकरिता परवानगी मिळण्याकरीता सादर केला आहे. प्रतिवादींतर्फे ॲड. श्री. यु. व्ही. जाधव यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादींना दाव्यातील मिळकतीसंबंधीचे दस्ताऐवज हे वेळेत न मिळाल्यामुळे ते त्यांचे लेखी जबाब मुदतीच्या आत सादर करु शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध दि.१०.०२.२०२० रोजी विना लेखी जबाब आदेश पारीत करण्यात आले. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, सदरचा अर्ज मंजूर झाल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आला तर प्रतिवादींचे नुकसान होईल. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजूर करून प्रतिवादींविरुद्ध झालेला विना लेखी जबाब आदेश रद्द करुन त्यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात यावा.

२. वादींतर्फे ॲड. श्री. व्ही. एस. शेळके यांनी सदरच्या अर्जावर असे उत्तर सादर केले आहे की, प्रतिवादींना दाव्याचे समन्स हे दि.१८.१०.२०१९ रोजी प्राप्त झाले असून सुध्दा त्यांनी मुदतीच्या आत त्यांचा लेखी जबाब सादर न केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध विना लेखी जबाब आदेश दि.१०.०२.२०२० रोजी पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादींनी दि.१८.१०.२०१९ पासून कोणते नवीन दस्ताऐवज काढले आहेत त्याबाबतचा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. तसेच प्रतिवादींनी सदरच्या अर्जात विलंबाचे दिलेले कारण हे खोटे आहे.

३. सदर दाव्यातील वादपत्राचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा घोषणा व कायमच्या मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी मुदतीच्या आत त्यांचा लेखी जबाब सादर न केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध विना लेखी जबाब आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादींनी त्यांच्या अर्जात नमूद केलेले कारण जर ग्राह्य धरून सदरचा अर्ज मंजूर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण सदरचा दावा हा अद्याप पुराव्याकरिता लागलेला नाही. प्रतिवादी यांचे लेखी जबाब अभिलेखावर घेतल्यास वादीं व प्रतिवादी यांच्यात असलेला मूळ वाद हा पुराव्याच्या आधारे न्यायालयासमक्ष येईल व सदरचा दावा हा निकाली काढताना न्यायालयास मदत होईल. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींविरुद्ध दि.१०.०२.२०२० रोजी पारीत झालेला विना लेखी जबाब आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादींचे लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात येते.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by Amol Ramchandra Surve
Date: 2021.01.04 16:41:42 +0530

अहमदपूर.
दिनांकः– ०४.०१.२०२१.

(अ.रा. सुर्वे.)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.